**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY**
(Formerly University of Pune)

**समन्वय कक्ष (माध्यम)**
गणेशखिंड, पुणे
दूरध्वनी : ०२०-२५६९२८२९

**Media Co-ordination Cell**
Ganeshkhind, Pune-7
Phone No : 020-25692829

दि. १६ मे २०१८

# विद्यापीठस्तरीय प्राध्यापकांच्या गुणवत्ता सुधारण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पुढाकार

- देशभरातील विद्यापीठ व महाविद्यालय प्राध्यापक प्रशिक्षण कार्यक्रमाला सुरुवात

पुणे -

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने देशभरातील आणि महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठ स्तरावर उपक्रमशील शिक्षण कार्यक्रम राबवण्यासाठी प्राध्यापक प्रशिक्षण आयोजित केले जात आहेत. या उपक्रमातील दोन दिवसीय कार्यशाळा वनस्पतिशास्त्र विभागाच्या वतीने नुकतीच पार पडली.

वनस्पतिशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. अंजली कुलकर्णी यांनी याविषयी अधिक माहिती दिली. त्या म्हणाल्या, शिक्षक व शिक्षण पद्धती यामध्ये गुणवत्ता सुधार कार्यक्रम हाती घेण्यासाठी विद्यापीठ स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. केंद्र शासनाच्या पंडित मदन मोहन मालवीय राष्ट्रीय मिशन अंतर्गत या कार्यशाळा आयोजित करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. वनस्पतिशास्त्र शाखेसंबंधी द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमात असणारे विषय प्राथमिक माहिती देणारे असतात आणि त्याच्याशी संबंधित सखोल माहिती एम.एस्सी. स्तरावर देण्यात येते. त्यामुळे आधी शिकवलेले विषय पुन्हा नव्याने विस्तृत पद्धतीने शिकवताना त्यात वेगळेपणा कसा असावा यावर कार्यशाळेत लक्ष केंद्रित केले होते.

या कार्यशाळेसाठी पुणे शहरातून ११ तर नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यातून सुमारे १३ प्राध्यापक सहभागी झाले होते. त्यासाठी तज्ज्ञ म्हणून दिल्ली विद्यापीठाचे डॉ. यशवंत मुद्गिल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डॉ. सुजाता भार्गव आणि राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळातील डॉ. चेतन गाडगीळ यांना निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी वनस्पतिशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. नूतन मालपाठक उपस्थित होत्या.

केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या वतीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात टीचर्स लर्निंग सेंटर सुरू झाले आहे. या उपक्रमांतर्गत विद्यापीठ संलग्न महाविद्यालये आणि राज्यातील सर्व महाविद्यालयांमधील प्राध्यापकांच्या विविध कार्यशाळा आयोजित केल्या जातात. यामध्ये देशभरातूनही प्राध्यापक सहभागी होत आहेत. विद्यापीठाच्या टीचर्स लर्निंग विभागाच्या वतीने आयोजित कार्यशाळेत सहभागी प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम शिकवताना प्रयोगशीलतेवर भर द्यावा यासाठी खास प्रशिक्षण दिले जाते.

--- चौकट ---

टीचर्स लर्निंग विभागाच्या संचालक प्रा. दिपाली मालखेडे म्हणाल्या, “प्राध्यापकांनी नवीन कौशल्य आत्मसात करून विद्यार्थी प्रशिक्षण कौशल्य वाढवण्यावर भर दिला पाहिजे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमधील प्राध्यापकांसाठी विविध विषयांना अनुसरून प्रशिक्षण वर्ग सुरू केले आहेत. केंद्र शासनाच्या विशेष तरतुदीमुळे सध्या विनामोबदला हे प्रशिक्षण दिले जात आहे. या कार्यशाळेत झालेल्या प्रशिक्षणाच्या आधारे प्राध्यापकांनी कालबद्ध कार्यक्रम त्यांच्या इथे आखणे व इतर सहकारी प्राध्यापकांना प्रशिक्षित करणे अपेक्षित आहे.” विद्यापीठात आयोजित केल्या जात असणाऱ्या नियोजित कार्यक्रमांपलीकडे जाऊन एखाद्या जिल्ह्यासाठी स्वतंत्र असे प्रशिक्षण कार्यशाळा भविष्यात राबवण्याचा विचार असल्याचेही त्यांनी सांगितले.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९मध्ये होणाऱ्या कार्यशाळेत सहभागासाठी विविध विद्यापीठ आणि महाविद्यालयांनी tlcchemsppu@gmail.com या इमेल आयडीवर संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

**अभिजित घोरपडे**
विशेष कार्याधिकारी, माध्यम समन्वय कक्ष
९८२२८४०४३६ | sppumediacell@gmail.com